लोकमत कोल्हापूर, शनिवार, दि. ३ ऑक्टोबर २०१५

# गांधीजींच्या 'महात्मा' होण्यापर्यंतच्या प्रवासाचे दर्शन

## शिवाजी विद्यापीठात प्रदर्शन : दुर्मीळ छायाचित्रांतून उलगडला इतिहासाचा ठेवा

कोल्हापूर : नाताळ काँग्रेसमधील समावेश, पहिला सत्याग्रह, अशा विविध दुर्मीळ छायाचित्रांच्या माध्यमातून शुक्रवारी गांधीजींच्या 'महात्मा' होण्यापर्यंतच्या प्रवासाचे दर्शन घडले. निमित्त होते... शिवाजी विद्यापीठातील 'दक्षिण आफ्रिकेतील गांधी' या दुर्मीळ छायाचित्र व ग्रंथ प्रदर्शनाचे.

महात्मा गांधी जयंतीनिमित्त विद्यापीठाच्या बॅ. बाळासाहेब खर्डेकर ग्रंथालयाच्या नूतन इमारतीतील आबालाल रहिमान आर्ट गॅलरीमध्ये गांधी अभ्यास केंद्र व ग्रंथालयातर्फे 'गांधी इन साऊथ आफ्रिका' हे छायाचित्र व ग्रंथ प्रदर्शन आयोजित केले आहे. त्याचे उद्घाटन 'बीसीयुडी'चे संचालक डॉ. डी. के. मोरे यांच्या हस्ते झाले. यावेळी ते म्हणाले, 'दक्षिण आफ्रिकेतील गांधी' या दुर्मीळ छायाचित्र व ग्रंथ प्रदर्शनाच्या माध्यमातून मोहनदास करमचंद गांधी या व्यक्तिमत्त्वाचा महात्मा गांधी होण्यापर्यंतच्या प्रक्रियेचा वेध घेता येऊ शकतो.



कोल्हापुरातील शिवाजी विद्यापीठात शुक्रवारी महात्मा गांधी जयंतीनिमित्त आयोजित ग्रंथ प्रदर्शनाला 'बीसीयुडी'चे संचालक डॉ. डी. के. मोरे यांनी भेट दिली. यावेळी शेजारी डावीकडून डॉ. नमिता खोत, प्रा. डॉ. भारती पाटील, आर. बी. पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, आदी उपस्थित होते.

कार्यक्रमास प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, परीक्षा नियंत्रक महेश काकडे, विद्यार्थी कल्याण विभागाचे संचालक डॉ. डी. के. गायकवाड, गांधी अभ्यास केंद्राच्या समन्वयक डॉ. भारती पाटील, ग्रंथपाल डॉ. नमिता खोत, डॉ. डी. व्ही. मुळे, डॉ. आर. बी. पाटील, उपग्रंथपाल डॉ. डी. बी. सुतार, आदी मान्यवर उपस्थित होते.

दरम्यान, या प्रदर्शनात महात्मा गांधी यांची दक्षिण आफ्रिकेतील वास्तव्यादरम्यानची ३० अत्यंत दुर्मीळ छायाचित्रे त्यांच्या माहितीसह प्रदर्शित केली आहेत. यात गांधीजींचा नाताळ काँग्रेसमधील सहभाग, पहिला सत्याग्रह, गांधीजींना वर्णभेदावरून रेल्वेतून बाहेर काढले ते स्थानक, आदी प्रसंगांच्या छायाचित्रांचा समावेश आहे.

प्रदर्शनामध्ये शिवाजी विद्यापीठाच्या बॅ. खर्डेकर ग्रंथालयातील महात्मा गांधी यांच्यासंदर्भातील सुमारे १०० निवडक ग्रंथही प्रदर्शित करण्यात आले आहेत. हे प्रदर्शन शुक्रवार (दि. ९) पर्यंत सकाळी साडेदहा ते सायंकाळी सहा यावेळेत सुरु राहणार असल्याचे प्रा. डॉ. भारती पाटील यांनी सांगितले. (प्रतिनिधी)